पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 20/03/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

## अवैधरीत्या देशी, विदेशी दारू, मोहाफुल गावठी दारु बाळगणाऱ्यांवर कार्यवाही

पो.स्टे. कुही :– अंतर्गत दिनांक 19/03/2020 रोजी उपविभागिय पोलीस अधिकारी यांचे आदेशाने विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले. दरम्यान कुही पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा चांपा, मौजा कळमना, दर्शन पॅलेस बार खापरी राजा येथे काही इसम दारू बाळगुण अवैधरीत्या व विनापरवाना व्यवसाय करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कुही पोलीसांनी नमुद वरील घटनास्थळी पारधी बेडयावर धाडी टाकल्या असता एकुण 10 केसेस करण्यात आले. घटनास्थळावरून 87,840 मिली. देशी दारू, 1500 मिली. विदेशी दारू 7600 लि., मोहाफुल सडवा व साहित्य असा एकुण 5,50,000/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कुही येथे आरोपीतांविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन दोन आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण), श्रीमती मोनिका राऊत, अपर पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण), उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्रीमती पोर्णिमा तावरे यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. पंजाबराव परघने ठाणेदार कुही, सहायक पोलिस निरीक्षक श्री सोनटक्के, पोउपनि श्री चिट्टे, मपोउपनि श्रीमती तकीत, सफौ काटे, कुंभरे, पोशि गिरी, अमित पवार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. बेला :– अंतर्गत मौजा सुकडी जुनोनी शिवार येथे दिनांक 18/03/2020 चे 07.00 वा. दरम्यान अशोक बिसन मंगाम, वय 65 वर्ष, रा. चनोडा, त. उमरेड, जि. नागपूर यांना त्यांच्या शेतात ईलेक्ट्रीक करंट लागुन ते खाली पडले. त्यांना उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे नेले असता त्यांचा मृत्यू झाला. संबंधीत कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अभिषेक अशोक मंगाम, वय 23 वर्ष, रा. चनोडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गणेश राय 9764382179 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर